## संपादकीय

### वसुलीची उठाठेव करण्यापेक्षा...

माध्यमात लाडकी बहीण हा शब्द प्रसिद्ध होत नाही असा एकही दिवस उजाडत नाही. कधी लाभार्थ्यांची पात्रता तपासणार असल्याचे तर कधी अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांकडून पैसे वसूल करणार असल्याचे सांगितले जाते. यामुळे खऱ्या लाभार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था असू शकेल. केंद्र अथवा राज्य सरकारी योजनांचे असे हसे का होते? एक तर योजना अंमलबजावणीअभावी फाईल बंद राहतात किंवा भ्रष्टाचारामुळे गाजतात. फसवणुकीचे किंवा अंमलबजावणीअभावी योजना फसल्याचे हे एकच उदाहरण नाही. सरकार गरिबांसाठी मोफत धान्य योजना राबवते. अनेक श्रीमंत माणसांनीदेखील त्याचा लाभ घेतल्याचे पुरवठा विभागाच्या शोधमोहिमेत उघड झाले आहे. सुमारे ३४ हजार लोकांनी गेले सहा महिने त्यांचे धान्य घेतलेले नाही. गरजू माणसे धान्य घेण्यासाठी रेशन दुकानाच्या पायऱ्या झिजवतात. मग ते सहा महिने धान्य घेणार नाहीत असे घडू शकेल का? नोकरी प्रशिक्षणासाठी बाहेरगावी जाव्या लागणाऱ्या महिलांना सुरक्षित निवास उपलब्ध होण्याच्या उद्देशाने केंद्र सरकार 'सखी निवास' योजना राबवते. नाशिक जिल्ह्यात तसा एकही निवास नसल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. राज्याच्या लाडकी बहीण योजनेच्या सुमारे अडीच कोटी लाभार्थ्यांपैकी सुमारे साडेसव्वीस लाख व्यक्ती अपात्र ठरल्याची माहिती खुद्द महिला व बालकल्याण मंत्र्यांनीच दिली. त्यात सरकारी महिला कर्मचारी आणि काही भावांचा समावेश आहे. त्यांच्याकडून ते पैसे वसूल करणार असल्याचे मंत्रिमहोदयांनी जाहीर केले आहे. ते कसे करणार याविषयी मात्र सरकारी पातळीवर अजून तरी चुप्पी आढळते. कारण शेवटी सरकारी पैसे गेले आहेत. कोणाचेही वैयक्तिक पैसे पणाला लागलेले नाहीत. त्यामुळे ते वसूल करण्यात खरेच किती जणांना रस असेल? निवडणूकपूर्व लोकानुनयी घोषणा करण्याची सवय अशा योजनांच्या मुळावर येत असावी. सरकारच्या आर्थिक नियोजनाचा बोजवारा उडवण्यास अशा योजना कारणीभूत ठरतात. लाडकी बहीणमुळे इतर विभागांच्या योजनांवर विपरीत परिणाम होतो. उदाहरणार्थ, गत महिन्याचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला गेल्याचे सांगितले जाते. योजना काय आहे हे विस्ताराने सांगितले जाते. पण त्याबरोबरीने उत्तरदायित्त्व आणि अंमलबजावणीविषयी काहीच सांगितले जात नाही आणि लोकही विचारत नाहीत. वस्तुनिष्ठ माहिती आणि आकडेवारी, योजनेच्या अचूक आराखड्याचा अभाव आणि गैरव्यवस्थापन यामुळे बहुसंख्य योजना निष्प्रभ ठरतात किंवा त्यात फसवणूक होते. जशी ती लाडकी बहीणमध्ये घडली. विविध निमित्ताने सरकारे नागरिकांची अनेक प्रकारची माहिती संकलित करतात. त्या माहितीची छाननी केली जाते का? तिचा उपयोग कुठे केला जातो? अर्थात, अशा फसवणुकीचा दोष फक्त सरकारला देऊन चालणार नाही. लोकही तितकेच कारणीभूत मानले जायला हवेत. आर्थिक संपन्न लोकांनाही त्याचा लोभ टाळता येत नाही आणि असे करण्यात त्यांना गैरही वाटत नाही. सरकारी पातळीवर शहानिशा किंवा पडताळणी केली जात नाही. केली तरी कारवाई होत नाही हा लोकभ्रम त्यांच्या अशा वर्तणुकीचे एक कारण ठरतो. म्हणजेच अप्रत्यक्ष त्याला सरकारच जबाबदार मानले जाऊ शकेल. सरकारी पातळीवरील अशा अकार्यक्षमतेचे परिणाम खऱ्या लाभार्थ्यांना भोगावे लागतात. लाडकी बहीणअंतर्गत दिली जाणारी आर्थिक मदत गरजू महिलांसाठी आधार ठरली. काहींनी त्याआधारे छोटे व्यवसाय सुरू केले. तथापि, उपरोक्त घडामोडींमुळे त्यांच्यात अस्वस्थता आहे. योजना बंद तर केली जाणार नाही ना अशी त्यांना भीती आहे. यातून सरकारला अनेक धडे शिकता येण्यासारखे आहेत. अचूक माहितीअभावी लोकानुनयासाठी घोषणांची घाई नको. योजना आणि अंमलबजावणी आराखडा आणि उत्तरदायित्वदेखील एकाच वेळी जाहीर करण्यासह पात्रता निकषांची वारंवार छाननीही गरजेची असते. अचूक माहितीचे (डेटा) संकलन आणि त्याचे संशोधन हा कोणत्याही योजनेचा मूळ गाभा असतो एवढे जरी यातून लक्षात आले तरी पुरे. म्हणजे अपात्र व्यक्तींकडून वसुलीची किंवा त्यांचे लाभ रद्दच्या उठाठेवी करण्याची वेळ येणार नाही. ती करण्यात मानवी श्रम, वेळ आणि पैसे वाया घालवण्यापेक्षा योजना जाहीर करण्यासाठी हे संसाधन वापरणे अधिक श्रेयस्कर नाही का?

# माती व पाणी परीक्षण करूनच पिकांना खते देणे फायदेशीर- डॉ. ससाणे



**राहुरी (तालका प्रतिनिधी)** – माती व पाण्याचा पीएच हा पिकांसाठी खूप महत्त्वाचा आहे. योग्य पीएचमुळे खतांची मात्रा योग्य प्रमाणात पिकांना उपलब्ध होते. यासाठी माती व पाण्याचे परीक्षण करूनच पिकांना खते देणे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले.

कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर महाविद्यालयातील मृदाशास्त्र विभागामध्ये चार दिवसीय माती व पाण्याची चाचणीमधील विश्लेषणात्मक तंत्रे या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना डॉ. ससाणे बोलत होते. याप्रसंगी कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, मृदाशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे, प्रशिक्षण कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. श्रीगणेश शेळके व डॉ. रितु ठाकरे उपस्थित होते.

डॉ. प्रशांत बोडके म्हणाले, दिवसेंदिवस जमिनीची प्रत खराब होत आहे. आपल्या पुढच्या पिढीला शेतीतून चांगले उत्पादन मिळण्यासाठी जमिनीचे आरोग्य चांगले असणे महत्त्वाचे आहे. पिकांद्वारे खतांचा कार्यक्षम वापर होण्यासाठी माती परीक्षण करुन खते देणे गरजेचे आहे. प्रशिक्षणार्थींनी माती व पाणी तपासणी करण्याबरोबरच शेतकऱ्यांना त्याविषयीचे योग्य मार्गदर्शन करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

प्रास्ताविकात डॉ. कांबळे म्हणाले, जमिनीची सुपीकता महत्त्वाची असून ती टिकवून ठेवणे गरजेचे आहे. यासाठी माती व पाण्याचे परीक्षण करुन त्यानुसार खत व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. देशामध्ये ८,२७२ माती परीक्षणाच्या प्रयोगशाळा असून आपल्या राज्यात ५८७ माती व पाणी परीक्षणाच्या प्रयोगशाळा आहेत. माती व पाणी परीक्षणाचा अचूक अहवाल मिळाल्यास त्यायोगे खतांची योग्य मात्रा देणे शक्य होते. त्यामुळे खतांमध्ये बचत होऊन जमिनीचे आरोग्य संवर्धनास मदत होते.

मान्यवरांच्या हस्ते मृदशास्त्र विषयावरील पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. या प्रशिक्षणासाठी दहा जिल्ह्यातून कृषि विज्ञान केंद्र, विद्यापीठातील मृदा शास्त्र विषयातील अधिकारी, खाजगी माती तपासणी प्रयोगशाळेतील कर्मचारी असे २५ प्रशिक्षणार्थी उपस्थित आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रितू ठाकरे यांनी तर आभार डॉ. श्रीगणेश शेळके यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. विजय पाटील, डॉ. रवींद्र गायकवाड, डॉ. प्रकाश लोखंडे, डॉ. सचिन सदाफळ तसेच मृदाशास्त्र विभागातील शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# वसुंधरा अकॅडमीचे कबड्डी स्पर्धेत सुयश



**अकोले (प्रतिनिधी)**– जळगाव येथील काशिनाथ पलोड पब्लिक स्कूल येथे सीबीएसई बोर्ड आयोजित विभागीय क्लस्टर कबड्डी स्पर्धा २०२५-२६ नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत अकोलेतील वसुंधरा अकॅडमीच्या अंडर १४ मुलींचा संघ व अंडर १७ मुलांचा संघ अशा दोन टीमचा सहभाग होता. त्यातील मुलींच्या व मुलांच्या संघांनी बेस्ट परफॉर्मर चषक पटकावला.

वसुंधरा अकॅडेमी मुलांच्या अंडर १७ च्या टीममध्ये आयुष लहामगे, सार्थक तळपे, आर्यन मुठे, विराज धुमाळ, पार्थ कांबळे, अक्षत कोंडार, साई दिघे यांचा सहभाग होता. तर मुलींच्या अंडर १४ च्या टीममध्ये अनुष्का पांगरकर, नालंदा जाधव, स्वराली वाकचौरे, स्वराली राऊत, रिद्धी वैद्य, सिद्धी वैद्य, अक्षरा घुले यांचा सहभाग होता. या स्पर्धेला महाराष्ट्र व गोवा येथून १२८ टीम आल्या होत्या. त्यामध्ये वसुंधरा अकॅडेमीच्या संघांनी नैपुण्य मिळवले. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक गोरक्षनाथ पोपेरे, सचिन बोंबले व वर्षा गोडे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर नवले, वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले, सचिव विक्रम नवले, मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलच्या प्राचार्या अल्फोसा डी., सर्व विभागांचे प्राचार्य व शिक्षक यांनी अभिनंदन केले.

# शनैश्वर देवस्थान कर्मचाऱ्यांचे उपोषण सुरु

## सहाव्या आयोगाप्रमाणे वेतन मिळण्याची मागणी




**सोनई (वार्ताहर)**– शनैश्वर देवस्थानच्या कायम कर्मचाऱ्यांनी सोमवार ४ ऑगस्ट रोजी देवस्थानच्या आवारात सहाव्या वेतन आयोगातील त्रुटी संदर्भात आमरण व साखळी पद्धतीने उपोषणास सुरुवात केली आहे.

सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे नियमानुसार सर्व विभागातील कर्मचाऱ्यांना देय वेतनश्रेणी व इतर भत्ते मिळावेत, महागाई भत्ता २४६ टक्के देण्यात यावा, १२ वर्षे सेवा झाल्यानंतर कालबद्ध पदोन्नती नियमानुसार मिळावी, सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती किंवा समकक्ष वेतनश्रेणी देण्यात यावी, कोरोना काळातील १८ महिन्यांचे थकीत वेतन अदा करावे, नियमानुसार दर सहा महिन्याला महागाईनुसार भत्ता वाढ करण्यात यावी, सहाव्या वेतन आयोगाचे पगारपत्रक अधिकृत शासनमान्य तज्ञ लेखा अधिकारी यांच्याकडून पडताळणी करून घेण्यात यावे, १ ऑगस्ट २४ पासूनच्या फरकासह सुधारित वेतन सर्व कर्मचाऱ्यांना मिळावी याप्रमाणे मागण्या केल्या आहेत.

# मुख्यमंत्र्यांच्या बैठकीला एकनाथ शिंदेंची दांडी

**मुंबई (प्रतिनिधी)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी मंत्रालयात आयोजित केलेल्या वॉररूमच्या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दांडी मारली. शिंदे यांनी बैठकीकडे पाठ फिरवल्याने फडणवीस-शिंदे यांच्यातील बेबनावाच्या चर्चेने जोर धरला आहे. महायुतीच्या सरकारमध्ये शिंदे गटाची होत असलेली कोंडी आणि त्यांच्या मंत्र्यांच्या विरोधात विरोधकांना रसद पुरवली जात असल्याच्या संशयाने एकनाथ शिंदे नाराज असल्याचे बोलले जात आहे.


फडणवीस यांनी काल मंत्रालयात आयोजित बैठकीत वॉररुमधील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. शिंदे यांच्या आजच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार ते बैठकीला उपस्थित राहणार होते. मात्र, ऐनवेळी त्यांनी ठाणे परिसरातील वाहतूक कोंडी आणि ठाण्याच्या रस्त्यावरील खड्डे याबाबत महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी. पोलीस आयुक्त यांची बैठक घेतली. खरे तर शिंदे यांच्याकडे नगरविकास खाते असल्याने त्यांनी या बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक होते. मात्र,बैठकीतील शिंदेंच्या अनुपस्थितीमुळे वेगवेगळे तर्क लावले जात आहेत.

**वर्षोनुवर्षे प्रकल्प चालवू नका : फडणवीस**

दरम्यान, पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेतल्यानंतर ते वेळेत पूर्ण व्हायला हवेत. त्यामुळे पायाभूत सुविधांचे प्रकल्प वर्षानुवर्षे चालू न राहता ते प्रकल्प हाती घेतल्यानंतर तीन वर्षांत पूर्णत्वास यायला हवेत, असे फेरनिर्देश देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत दिले.

# स्वच्छता वेळेवर होत नसल्यामुळे पुणतांबेकरांचे आरोग्य धोक्यात- जाधव

**पुणतांबा (वार्ताहर)**– पुणतांबा ग्रामपंचायत प्रशासनाकडून काही ठिकाणी वेळेवर स्वच्छता होत नसल्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ग्रामपंचायतीने याबाबत तातडीने कार्यवाही केली नाही तर मनसेच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयासमोर धडक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसेचे तालुकाध्यक्ष गणेश जाधव यांनी दिला आहे.



पुणतांबा येथील स्टेशन रोडवर बस थांब्याजवळ मुतारी बांधलेली आहे. तिची दररोज स्वच्छता करणे आवश्यक आहे. स्टेशन रोडवरील व्यावसायिक तसेच प्रवाशांसाठी ती अत्यंत आवश्यक आहे. विशेष म्हणजे स्टेशन रोडवरील अनेक व्यावसायिक मुतारीच्या पुढेच कचरा टाकतात. तोही दररोज उचलण्याची गरज आहे. कचरा दररोज उचलत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी निर्माण होते. मुतारी ज्या ठिकाणी आहे, त्या जवळच दक्षिण बाजूला शाळा आहे. त्या दुर्गंधीचा त्रास विद्यार्थ्यांना होतो आणि कचऱ्याचे ढिग पडलेले असल्यामुळे स्टेशन रोडवरील प्रवाशी, ग्रामस्थांना मुतारीचा उपयोग करता येत नाही.

गावात इतर ठिकाणीही स्वच्छतेचा बोजवारा उडालेला आहे. मध्यंतरात पडलेल्या रिपरिप पावसामुळे गावात ठिकठिकाणी गवत वाढले आहे. तसेच डासांचे प्रमाणही जास्त झाले आहे. त्यामुळे रोगाचा प्रार्दूभाव टाळण्यासाठी ग्रामपंचायतीने तातडीने फवारणी करण्याची गरज आहे. ग्रामपंचायतीने स्वच्छतेचे काम तत्पर केले नाही तर ज्या ठिकाणी कचऱ्याचे ढिग पडले आहेत, ते उचलून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आणून फेकले जाईल, असा इशाराही श्री. जाधव यांनी दिला आहे.

# पुणतांब्यात पर्यायी उद्योगाच्या जागेत बहरले मक्याचे पीक

**पुणतांबा (वार्ताहर)**– पुणतांबा येथे पर्यायी उद्योगाच्या जागेत सध्या मक्याचे पिक बहरले दिसत आहे.



पुणतांबा येथील युवकांना रोजगार मिळावा म्हणून तात्कालिक कृषीमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे पुणतांबा येथे कोपरगावकडे जाणाऱ्या रस्त्यालगत खताच्या कारखान्याचे भूमीपूजन करण्यात आले होते. यासाठी १० एकर जमीन महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने ताब्यात घेतली होती. या जागेला ९ लाख रुपये खर्च करून चारही बाजूने संरक्षित भिंत बांधण्यात आली होती. मात्र २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाला बहुमत न मिळाल्यामुळे ते पुन्हा सत्तेवर आले नाहीत. त्यामुळे पर्यायी उद्योगाचा प्रश्न मागे पडला. एवढेच नाही तर हा प्रकल्प दुसरीकडे स्थलांतरित झाल्याचे समजते. मात्र पर्यायी उद्योगाची जागा अजूनही कृषी विभागाच्या ताब्यात आहे आणि ती पडीत आहे. त्यामुळे तिच्यामध्ये बऱ्याच वेळा वेड्या बाभळीचे जंगल उभे राहते. मात्र काही वर्षांपासून या १० एकरामध्ये खरीप व रब्बीचे पीक घेतले जाते. कदाचित कृषी उद्योग विकास महामंडळाने हे क्षेत्र कुणाला कराराने शेती करण्यास दिले की काय, अशी चर्चा आहे. सध्या मात्र जागेत मक्याचे पिक बहरले आहे. या जागेत पर्यायी उद्योग सुरू व्हावा म्हणून परिसरातील ग्रामस्थांचे शिष्टमंडळ लवकरच कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेणार असल्याचे समजते.

# श्रीरामपूर येथे संत लोयोलाकर यांचा सण साजरा

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य ख्रिस्ती अल्पसंख्यांक विकास परिषदेच्या वतीने व राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने संत इग्नाथी लोयोलाकर यांच्या सणानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आला.



यावेळी लेविन भोसले यांनी संत इग्नाथी लोयोलाकर यांचे आत्मचरित्र सांगितले. तसेच चर्च परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. माजी आमदार लहू कानडे लिखित चिंतन पुस्तक देऊन पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. लोयोला धर्मग्रामाचे प्रमुख धर्मगुरू रे.फा. प्रकाश भालेराव, रे.फा. रत्नाकर दुशिंग, माजी नगराध्यक्षा अनुराधाताई, अशोक कानडे, फेलोशिपचे पास्टर अध्यक्ष राजेश कर्डक, पास्टर दीपक शेळके, माजी नगरसेवक राजेश अलग, माजी नगरसेवक प्रकाश ढोकणे, माजी नगरसेविका अनिता प्रकाश ढोकणे, चांगदेव देवराय राष्ट्रवादी काँग्रेस अनुसूचित विभाग, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अनुसूचित विभाग दीपक कदम, तालुकाध्यक्ष एकलव्यचे प्रदेशाध्यक्ष शिवाजीराव गांगुर्डे, डॉ.राजीव साळवे, जेम्स पंडित, भैय्या शाह, शरद पंडीत, विलास पटारे, लेविन भोसले, रवींद्र लोंढे, सुरेश ठुबे, निशिकांत पंडित, फ्रान्सीस शेळके, बबलू लोंढे, खंडागळे गुरुजी, अशोक पवार, भाऊसाहेब आढाव, प्रतिमा पंडित, लुसिया तपासे, मंगल सगळगिळे, विना दुशिंग, दिलीप सगळगिळे, राजेंद्र सूर्यवंशी, रामदास ढोकणे, अविनाश पोहेकर, संदीप हिवाळे, सचिन रुपटक्के, संदीप साळवे, विजय त्रिभुवन, रवी रणदिवे आदी मान्यवर उपस्थित होते. दीपक कदम यांनी आभार मानले.

# अकोलेत लोकशाहिरांची जयंती उत्साहात



**अकोले (प्रतिनिधी)**– शहरातील इंदिरानगर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना वह्या व पुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहाचे लोकार्पण आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते करण्यात आले. लोकशाहिरांच्या प्रतीकात्मक पुतळ्याची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी देव मामलेदार बँड खास आकर्षण ठरल्याने शहरातील रस्ते गर्दीने फुलून गेले होते. यात मातंग समाज बांधव व इतरही समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात यावे, अशी मागणी अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साळवे यांनी केली. याप्रसंगी मंडळाचे कार्यकर्ते तुषार अवचिते, सनी गायकवाड, सागर अवचिते, सागर गायकवाड, भारत गायकवाड, नीलेश लांडगे, विजय साळवे, अजय मोहिते, अनिल जाधव, राहुल गायकवाड, सचिन खरात आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# शिर्डीत विराट प्रतिष्ठानच्यावतीने अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**शिर्डी (प्रतिनिधी)**– विराट प्रतिष्ठानच्यावतीने लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त शिर्डीमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी उपस्थित राहून अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे स्मरण करत सामाजिक एकतेचा ठाम संदेश दिला.

तत्पूर्वी शिर्डीत पार पडलेल्या साईचरित्र पारायण मिरवणूक सोहळ्यास देखील डॉ. सुजय विखे पाटील यांनी भेट देत भक्तिभावाने सहभाग घेतला. त्यांनी फुगडीचा आनंद सुद्धा घेतला तसेच भाविकांना नाश्ता वाटप केला. यावेळी भैय्या शेळके, रवी गोंदकर, सर्वोदय सरोदे, निलेश सरोदे तसेच शिर्डी परिसरातील माता-भगिनी, ग्रामस्थ, युवक आणि मोठ्या संख्येने उपस्थित होते.



डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांमधून मिळालेल्या प्रेरणेतून सामाजिक समतेचा विचार रुजवला गेला पाहिजे. तसेच निलेश सरोदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडला. समाजबांधवांनी एकत्र येऊन जयंती साजरी करत एकोपा जपल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी ग्रामस्थांनी शिर्डी शहरातील चौकाला लहुजी वस्ताद यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी केली. त्या मागणीचा मान राखत डॉ. विखे पाटील यांनी त्या चौकाच्या नामकरणासाठी नगरपंचायतीमध्ये तातडीने ठराव मंजूर करून पुढील कार्यवाही करत नाव देण्यात येईल, असा विश्वास दिला. तसेच समाज मंदिराची देखील मागणी ग्रामस्थांनी केली व तत्काळ प्रतिसाद देत घोषणा देखील डॉ. विखे यांनी केली. पण समाजमंदिराचा उपयोग महामानवांच्या कार्याला साजेसा व्हावा, असा संदेशही त्यांनी दिला. समाजामध्ये कोणताही जातीय भेदभाव न ठेवता सर्वांनी मिळून सामाजिक प्रगतीसाठी काम करणे हीच खरी लोकशाही असल्याचे त्यांनी नमूद केले.